**सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी ऑनलाईन पद्धतीने नामतालिका तयार करणेबाबत**

**सन २०२६-२०२८**

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

५- बी. जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

**दुरध्वनी क्र. ०२०-२६१२२८४६/४७,** **इमेल:**-comm. audit.18@gmail.com

---

**जा.क्र.: सआ-२०/ले.प. / लेखापरीक्षक नाम. सुधारित कृती कार्यक्रम / सन २०२६-२०२८/** १११३ **/२०२६,**

**दिनांक :**२९**/०७/२०२६**

## सुधारित कृती कार्यक्रम

**विषय : सन २०२६-२०२८ या कालावधीच्या लेखापरीक्षक नामिकेसंदर्भातील ऑनलाईन अर्ज मागणी, छाननी या संदर्भातील सुधारित कृती कार्यक्रम...**

**संदर्भ :-**

१. या कार्यालयाचे सन २०२६-२८ सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणासाठी ऑनलाईन पद्धतीने नामतालिका तयार करणे बाबतचे परिपत्रक जा.क्र. सआ-२० / लेखापरीक्षण/ लेखापरीक्षक नामतालिका/२०२६-२८/५१२ / २०२६, दिनांक १/४/२०२६,

२. या कार्यालयाचे सन २०२६-२८ सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणासाठी ऑनलाईन पद्धतीने नामतालिका तयार करणे बाबतचे शुद्धीपत्रक जा.क्र. सआ-२० / लेखापरीक्षण/ लेखापरीक्षक नामतालिका/२०२६-२८/५६६/ २०२६, दिनांक १६/४/२०२६,

३. या कार्यालयाचे सन २०२६-२८ सहकारी संस्थाच्या लेखापरीक्षणासाठी ऑनलाईन पद्धतीने नामतालिका तयार करणे बाबतचे शुद्धीपत्रक २ जा.क्र. सआ-२०/ लेखापरीक्षण/ लेखापरीक्षक नामतालिका/२०२६-२८/६४२ / २०२६, दिनांक ४/५/२०२६

४. या कार्यालयाचे जा.क्र. सआ-२०/ ले.प./लेखापरीक्षक नामतालिका/जिल्हा अर्ज छाननी /२०२६-२८ /८५२/ २०२६, दिनांक १०/६/२०२६.

५. या कार्यालयाचे जा.क्र. सआ-२०/ ले.प./लेखापरीक्षक नामतालिका/जिल्हा अर्ज छाननी /२०२६-२८ /९७१/ २०२६, दिनांक ३०/६/२०२६

६. या कार्यालयाचे सुधारित कृति कार्यक्रम सूचना जा.क्र. सआ-२०/ ले.प./लेखापरीक्षक नामतालिका सुधारित कृती कार्यक्रम/ सन २०२६-२८ /१०६२/ २०२६, दिनांक १५/७/२०२६

**सन २०२६-२०२८** या कालावधीसाठीची राज्यस्तरीय लेखापरीक्षक नामतालिका तयार करण्यासाठी https://mahasahakar.maharashtra.gov.in संकेतस्थळावर दिनांक **०६/४/२०२६ ते ३१/५/२०२६** या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात आलेले होते. अर्जदार यांना संकेतस्थळावर अर्ज भरताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी व विविध संघटनाचे अर्ज / निवेदने विचारत घेऊन अर्ज भरण्यास संदर्भ क्रमांक २ व ३ अन्वये वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे.

सन २०२६-२०२८ या कालावधीसाठी लेखापरीक्षक संकेतस्थळावर आज अखेर सर्व प्रकारच्या लेखापरीक्षकांचे १५२४४ ऑनलाईन अर्ज प्राप्त झालेले आहेत. नामतालीकेसाठी आलेल्या अर्जाची छाननी जिल्हा स्तरावर छाननीसाठी संदर्भ क्र. ४ व ५ वेळोवेळी जिल्हा स्तरीय छाननी समितीस मुदतवाढ दिलेली आहे. त्यानुसार जिल्हा स्तरीय समितीस छाननी कामकाजासाठीचा अंतिम दि. १०/७/२०२६ असा होता. त्यानुसार जिल्हा स्तरीय छाननीचे कामकाज पूर्ण झाले आहे. सहकार आयुक्त स्तरावरील छाननी कामकाजासाठी दिनांक ३१/७/२०२६ पर्यंत मुदत आहे. तथापि आजअखेर सहकार आयुक्त स्तरावर पूर्ण झालेले छाननी कामकाज पाहता व वेबसाईटवर आलेल्या तांत्रिक अडचणी पाहता विषयांकीत प्रकरणी या संदर्भातील **सहकार आयुक्त व तक्रार निवारण समिती तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे स्तरावरील छाननी कामकाज बाबतचा** सुधारित कृती कार्यक्रम पुढील प्रमाणे जाहीर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामकाजाचे स्वरुप | कालावधी | | दिवस |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| १. | नामतालिका तयार करणेबाबतची सूचना प्रसिद्ध करणे.(ऑनलाईन पद्धतीने वेबसाईटवर, कार्यालयांचे नोटीस बोर्डवर, प्रसिद्ध करणे. इ.) | ०२/४/२०२६ | | १ |
| २. | नवीन नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करण्याचा कालावधी. | ०६/४/२०२६ | ३१/५/२०२६ | ५६ |
| ३. | नवीन नामतालिकेसाठी सादर झालेले ऑनलाईन अर्ज व पात्रतेसंदर्भातील आवश्यक ती कागदपत्रे यांची छाननी जिल्हा स्तरावरील समितीने करणे. | ०१/०६/२०२६ | १०/७/२०२६ | ४० |
| ४. | जिल्हा स्तरीय समितीने छाननी केलेल्या ऑनलाईन अर्जाची व पात्रतेसंदर्भातील आवश्यक त्या कागदपत्रांची तपासणी सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर करणे. | १३/०७/२०२६ | १०/०८/२०२६ | २९ |
| ५. | अस्विकृत अर्जांचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागणे, तसेच अस्विकृत अर्जांपैकी ज्यांनी तक्रार निवारण समितीकडे दाद मागितलेली आहे, त्यासंदर्भातील तक्रार निवारण समिती स्तरावरील छाननी कामकाज करणे व सहकार आयुक्त कार्यालयास दैनंदिन अहवाल पाठविणे. | ११/०८/२०२६ | २५/०८/२०२६ | १५ |

| अ. क्र. | कामकाजाचे स्वरुप | कालावधी | | दिवस |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | |
| ६. | अस्विकृत अर्जांचे विरोधात तक्रार निवारण समितीकडे दाद मागितलेल्या अर्जांपैकी समितीने स्विकृत करणेसाठी शिफारस केलेल्या अर्जासंदर्भातील छाननी कामकाज सहकार आयुक्त कार्यालय स्तरावर करणे. | २७/०८/२०२६ | ३१/०८/२०२६ | ०५ |
| ७. | पात्र लेखापरीक्षकांची यादी सहकार आयुक्त स्तरावर अंतीम करणे. | ०७/०९/२०२६ | | |

लेखापरीक्षकांच्या नामतालिकेसाठी ऑनलाईन अर्जाचा कालबद्ध सुधारित कृती कार्यक्रम, लेखापरीक्षकांची पात्रता व छाननी संदर्भातील सविस्तर तपशील https://mahasahakar.maharashtra.gov.in/en/ या लिंकवर व सहकार आयुक्त यांचे संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**( दिपक तावरे** भा.प्र.से.)
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत माहितीस्तव:**

१) मा. प्रधान सचिव (सहकार व पणन ), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) आयुक्त, ( वस्त्रोद्योग ), वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर
४) संचालक, पणन संचालनालय, महाराष्ट्र राज्य ,पुणे
५) अपर आयुक्त व विशेष निबंधक, महाराष्ट्र राज्य ,पुणे
६) अपर निबंधक, सहकारी संस्था (वसुली व नियोजन / तपासणी व निवडणूक / प्रशासन)
७) विशेष कार्य अधिकारी तथा अतिरिक्त निबंधक, पदुम लेखापरीक्षा मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८) सहकार आयुक्त यांचे खाजगी सचिव.

**प्रत :- पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी व सुचना फलकावर प्रसिद्धीसाठी :**

१) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, सर्व विभाग.
२) विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरीक्षण) सर्व विभाग.
३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व.
४) जिल्हा विशेष लेखापरीक्षक, वर्ग-१ , सहकारी संस्था, सर्व.

उक्त अनुक्रमांक १ ते ४ यांनी आपल्या विभागातील / जिल्ह्यात कार्यरत सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक संघटना यांना सदरचे सुधारित परिपत्रक क्र. ३ निर्देशनास आणून द्यावे.